# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक – ४१०/२०२४ दिनांक- ०६/११/२०२४

## प्रेस नोट

**“ गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या दोन मोठया अड्ड्यावर छापा टाकुन लाखोचा मुद्देमाल नष्ट करण्यात गुन्हे शाखा कक्ष -३ विरार यांना यश”**

दि. ०६/११/२०२४ रोजी सकाळी ०७.३० वा. चे सुमारास गोपनीय बातमीदार याचे मार्फतीने गुन्हे शाखा कक्ष -३ च्या पथकाला माहिती मिळाली की, नालासोपारा पुर्व, सागपाडा, डोंगरपाडा लगतच्या जंगलातील डोंगर परिसरात बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टी दारु तयार करणा-या दोन मोठे अड्डे असुन तेथे मोठया प्रमाणात गावठी हात भट्टी दारु तयार होत असल्याची माहिती मिळाल्याने सदर गोपनीय बातमीवरुन नालासोपारा पुर्व, सागपाडा, डोंगरपाडा लगतच्या जंगलातील डोंगर परिसरात छापा घालुन करण्यात आलेल्या कारवाई मध्ये १,५६,२००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला त्यात १) १५२० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश. २) दोन तांबा धातुच्या टाक्या, दोन तांबा धातुचे थाळीचा टाव (सतेले), ३) दोन लाकडी चाटु त्यास स्टिल धातुची नळी असलेले अशी गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याची साधने मिळुन आले असुन आरोपीत विरुध्द पो.अं/ २३३४८ तुषार हिरामन दळवी नेमणुक - गुन्हे शाखा कक्ष-३ विरार यांनी सरकारतर्फे पेल्हार पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली असुन सदर बाबत पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८२४/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ब)(क)(ड)(फ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, सपोनि/ सोपान पाटील, पोउपनिरी/ उमेश भागवत, पोहवा/मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, तुषार दळवी, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ विरार यांनी पार पाडली आहे.



------ooooo-------